# शासकीय अभियांत्रिकी महाविदयालय यवतमाळ
**(GOVERNMENT COLLEGE OF ENGINEERING YAVATMAL)**
धामणगाव रोड यवतमाळ -445001
website -www.gcoey.ac.in
ई-मेल
कार्यालय-०७२३२ २४३२७८ office.gcoeyavatmal@dtemaharashtra.gov.in
प्राचार्य कक्ष -०७२३२ २३८६८३ office@gcoey.ac.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

परिपत्रक :

जा.क्र/शाअभिमय/विवि/2026/ 656
दिनांक- 23/3/2026

विषय : राज्यातील विदयार्थीनीसाठी मासिक पाळीदरम्यान विशेष शैक्षणिक सवलत व आरोग्य सु विधांबाबत धोरणनिर्मिती बाबत...

संदर्भ : मा. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांचे पृष्ठांकन क्र.तंशिविकाअ/शिक्षण/2026/655 दिनांक 11 मार्च 2026

संस्थेतील सर्व विभागप्रमुख/प्रभारी अधिकारी यांना कळविण्यात येते की, विदयार्थीनींसाठी मासिक पाळी दरम्यान दरमहा जास्तीत जास्त तीन दिवसांची विशेष शैक्षणिक सवलत, आवश्यकतेनुसार पुर्नपरिक्षा सुविधा तसेच महाविदयालयांमध्ये आरोग्यांसंबधित मुलभुत सुविधा अनिवार्य करण्याबाबत मार्गदर्शक सुचना वरिष्ठ कार्यालयाकडुन वरिल संदर्भान्वये प्राप्त झालेल्या आहे. त्याअनुषंगाने आपल्या विभागातील प्रवेशित विदयार्थीनीं संबधित सोबतच्या निवेदनात दिलेल्या मुदयांच्या अनुषंगाने योग्य ती कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल प्राचार्य यांना सादर करावा.अधिक माहितीकरीता संदर्भिय पत्र जोडण्यात येत आहे.

सोबत : वरिलप्रमाणे

23/3/26

प्राचार्य
शासकीय अभियांत्रिकी महाविदयालय,
यवतमाळ

प्रत : 1. मा.सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना माहितीकरीता सविनय सादर.
2. सर्व विभागप्रमुख संगणक अभि., अणुविदयुत अभि., विदयुत अभि., यंत्र अभि.,स्थापत्य अभि. शा.अभि. महाविदयालय, यवतमाळ यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता .
3. प्रोग्रामर, शा.अभि. महाविदयालय, यवतमाळ यांना संकेतस्थळावर टाकण्याकरीता.

महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४३६/४७६,
ई-मेल-desk१६@dtemaharashtra.gov.in,वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

DTEM-D१६/२९/२०२६-DESK१६

प्रति,
सहसंचालक,
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/छत्रपती संभाजीनगर/अमरावती/नागपूर

संचालक,
महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई

विषय :- राज्यातील विद्यार्थीनींसाठी मासिक पाळीदरम्यान विशेष शैक्षणकि सवलत व आरोग्य सुविधाबाबत धोरणनिर्मिती संदर्भात निवेदन.

संदर्भ :- उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे पत्र क्र.संकीर्ण-२०२६/प्र.क्र.०१(६७/२०२६)/समन्वय, दि.१८ फेब्रुवारी, २०२६

उपरोक्त विषयांबाबत शासनाचे संदर्भाधीन शासन पत्र व त्यासोबतचे श्री.प्रसाद अरविंद भालेकर, समुहप्रमुख जीवन केशरी मराठी विद्यार्थी समुह, नाशिक यांचे दिनांक १७.०२.२०२६ चे निवेदन सोबत जोडून पाठविण्यात येत आहे ते कृपया पहावे.

तरी सोबतच्या निवेदनातील मुद्यांच्या अनुषंगाने, योग्य ती कार्यवाही करण्याबाबतचे निर्देश आपल्या अधिपत्याखालील सर्व संस्थांना देण्यात यावेत.

Digitally signed by
DHANAPAL A KAMBLE
Date: 04-03-2026
18:26:50
(डॉ. धनपाल कांबळे)
सह संचालक, तंत्र शिक्षण, म.रा., मुंबई

सोबत मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्र. DTEM-D१६/२९/२०२६-DESK१६ दिनांक ०४/०३/२०२६ अन्वये राज्यातील विद्यार्थीनींसाठी मासिक पाळीदरम्यान विशेष शैक्षणिक सवलत व आरोग्य सुविधाबाबत धोरणनिर्मीती संदर्भात निवेदन प्राप्त झाले असून सोबतच्या निवेदनातील मुद्यांच्या अनुषंगाने, योग्य ती कार्यवाही करावी.

पृष्टांकन क्र: तंशिविकाअ/शिक्षण/२०२६/ 655
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,अमरावती.
दिनांक. 11 MAR 2026

प्रति,

प्राचार्य, सर्व व्यावसायिक तांत्रिक अभ्यासक्रमांच्या संस्था, अमरावती विभाग, अमरावती यांना कळविण्यात येते की, सोबतच्या निवेदनातील मुद्यांच्या अनुषंगाने योग्य ते कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा.

(डॉ.व्ही.आर.मानकर)
प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती.

प्रत :- **प्रोग्रामर,** तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,अमरावती यांना संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याकरीता.

Endos

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार, चौथा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२
Email ID:- [illegible]@gov.in

[illegible] संकीर्ण-२०२६/प्र.क्र. ७१ (६७/२०२६)/समन्वय    दिनांक:- १८ फेब्रुवारी, २०२६.

प्रति,

१) संचालक, (उच्च शिक्षण), उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) संचालक, (तंत्र शिक्षण), तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३) संचालक, (कला), कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४) संचालक (ग्रंथालय), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

विषय:- राज्यातील विद्यार्थीनींसाठी मासिक पाळीदरम्यान विशेष शैक्षणिक सवलत व आरोग्य सुविधांबाबत धोरणनिर्मिती संदर्भात निवेदन

सोबत "राज्यातील विद्यार्थीनींसाठी मासिक पाळीदरम्यान विशेष शैक्षणिक सवलत व आरोग्य सुविधांबाबत धोरणनिर्मिती संदर्भात" श्री. प्रसाद अरविंद भालेकर, समुहप्रमुख, जीवन केशरी मराठी विद्यार्थी समुह, नाशिक यांचे दिनांक १७/२/२०२६ चे निवेदन माहिती तथा उचित कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहे.

आपली,

(संचिता जाधव)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

सोबत : वरीलप्रमाणे.

# सुविधा बाबत धोरणनिर्मिती संदर्भात निवेदन

Prasad Bhalekar <jivankeshrimarathi@gmail.com>

Tue 2/17/2026 1:31 PM

Reply all |

To: RANJIT SINGH DEOL; B.Venugopal Reddy, A.C.S.; Shri. Devendra Fadnavis (Chief Minister); min.sch.edu@gmail.com; Shri. Eknath Sambhaji Shinde; js.mashi-hied@mah.gov; director.dhepune@nic.in; Tushar. Mahajan;

Cc: cm.up@nic.in; Secretary State Board Pune <secretary.stateboard@gmail.com>; Dr. Anoop Kumar Yadav; dodsecondary1@gmail.com; ds.wcd-mh@mah.gov.in; min.wcd@maharashtra.gov.in; dydenskext@yahoo.com; dd.nashik@mahedu.gov.in; nagraj.ddm@gmail.com; dydpune@gmail.com; ronashik@dtemaharashtra.gov.in; educommoffice@gmail.com; Dr. Govinda Raj (ACS); Vandana Krishna; ednsec.apnashik@gmail.com; commissioner@nmc.gov.in; ceozpntk@gmail.com; comicdsraigadbhavan@gmail.com; himgaurlaher@gmail.com; Devyani Pharande <devnasik2@gmail.com>; nbpnasik@gmail.com; nskedit@gmail.com; gavmalia123@gmail.com; prahaarvarta@gmail.com; navarashtransk@gmail.com; mahanagarnskedit@gmail.com; mtmashik@gmail.com; Dainik Bhramar <dailybhramar@gmail.com>; Divisional Commissioner, Nashik; cdnashik.lokmattimes@gmail.com; Exam Department State Board Pune <hodexamstateboard@gmail.com>

Inbox

To help protect your privacy, some content in this message has been blocked. To re-enable the blocked features, click here.

To always show content from this sender, click here.

मा. महोदय / मा. महोदया,

सविनय कळविण्यात येते की, राज्यातील माध्यमिक, उच्च माध्यमिक तसेच महाविद्यालयीन स्तरावरील विद्यार्थिनींना मासिक पाळीदरम्यान शैक्षणिक नुकसान होऊ नये या उद्देशाने शासनस्तरीय स्पष्ट मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याबाबत संलग्न निवेदन सादर करीत आहोत.

या निवेदनामध्ये विद्यार्थिनींसाठी दरमहा जास्तीत जास्त तीन दिवसांची विशेष शैक्षणिक सवलत, आवश्यकतेनुसार पुनर्परीक्षा सुविधा, तसेच शाळा/महाविद्यालयांमध्ये आरोग्य व स्वच्छता संबंधित मूलभूत सुविधा अनिवार्य करण्याबाबत धोरणात्मक बाबी नमूद करण्यात आल्या आहेत. हा प्रस्ताव कोणत्याही संस्थेविरुद्ध नसून विद्यार्थिनींच्या आरोग्य, सन्मान व शैक्षणिक समतेच्या दृष्टीने सकारात्मक पाऊल उचलण्याच्या हेतूने सादर करण्यात येत आहे.
राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० मधील समावेशक व विद्यार्थी-केंद्रित शिक्षण व्यवस्थेच्या तत्त्वांनुसार तसेच संवैधानिक मूल्यांच्या अनुषंगाने या विषयावर स्पष्ट धोरण जाहीर होणे आवश्यक असल्याचे आम्हाला वाटते.

सदर निवेदनावर सहानुभूतीपूर्वक व गांभीर्याने विचार करून आवश्यक ते परिपत्रक / शासन निर्णय निर्गमित करण्यात यावेत, ही नम्र विनंती.

धन्यवाद.

आपला विश्वासू,

चिं. प्रसाद अरविंद भालेकर
समूहप्रमुख
जीवन केशरी मराठी विद्यार्थी समूह, नाशिक
मो. ७४९९३५४०४२



Scanned with OKEN Scanner

# जीवन केसरी मराठी विद्यार्थी समूह, नाशिक

विद्यार्थ्यांच्या हितासाठी, महाराष्ट्राच्या भवितव्यासाठी...!

जावक क्रमांक : जीकेमविस/शाशिसु/२०२६/१७/०२/१ दिनांक : १७ फेब्रुवारी २०२६

## सविनय निवेदन

प्रति,

मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र राज्य
मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य

**विषय : मासिक पाळीदरम्यान विद्यार्थिनींना शैक्षणिक नुकसान न होता विशेष शैक्षणिक सवलत, पुनर्परीक्षा व आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत शासनस्तरीय आदेश निर्गमित करण्याबाबत निवेदन**

महोदय / महोदया,

सविनय निवेदन असे की, राज्यातील माध्यमिक, उच्च माध्यमिक, महाविद्यालयीन व तंत्रशिक्षण संस्थांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थिनींच्या शैक्षणिक प्रगतीसाठी समावेशक व संवेदनशील वातावरण निर्माण करणे ही आजच्या काळाची गरज आहे. मासिक पाळी ही स्त्रियांच्या जीवनातील एक नैसर्गिक जैविक प्रक्रिया असून या कालावधीत अनेक विद्यार्थिनींना शारीरिक वेदना, अशक्तपणा, मानसिक ताण किंवा इतर आरोग्यविषयक समस्यांचा सामना करावा लागतो. या परिस्थितीत नियमित शैक्षणिक उपस्थिती राखणे अनेकांना कठीण होते, परंतु सध्या अशा प्रसंगी विद्यार्थिनींना अनुपस्थिती, गुणकपात किंवा शैक्षणिक नुकसानाचा सामना करावा लागतो.

भारतीय राज्यघटनेतील अनुच्छेद १४ (समानतेचा हक्क), अनुच्छेद २१ (जीवन व प्रतिष्ठेचा हक्क), अनुच्छेद २१अ (शिक्षणाचा हक्क) तसेच लैंगिक समानता व महिला सक्षमीकरणाच्या संवैधानिक तत्त्वांच्या अनुषंगाने विद्यार्थिनींना त्यांच्या जैविक आवश्यकतांमुळे शैक्षणिक नुकसान होणे हा मूलभूत अधिकारांच्या तत्त्वांशी विसंगत ठरते. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० मध्येही विद्यार्थी-केंद्रित,

देशातील काही राज्यांनी या दिशेने पुढाकार घेतला असून त्यांनी विद्यार्थिनींसाठी मासिक पाळी रजेची तरतूद केली आहे. केरळ, बिहार आणि काही इतर राज्यांमध्ये विद्यार्थिनींना दरमहा एक किंवा दोन दिवसांची विशेष शैक्षणिक सवलत देण्यात येते. महाराष्ट्र राज्य सामाजिक प्रगतीशीलतेसाठी ओळखले जाते, त्यामुळे या विषयावर आघाडीवर राहणे अपेक्षित आहे.

या पार्श्वभूमीवर खालील उपाययोजना राबविण्यासाठी विनम्र निवेदन करण्यात येत आहे :

१. प्रथम, माध्यमिक, उच्च माध्यमिक, महाविद्यालयीन व तंत्रशिक्षण स्तरावरील सर्व विद्यार्थिनींना मासिक पाळीदरम्यान दरमहा जास्तीत जास्त तीन दिवसांची विशेष शैक्षणिक सवलत घेण्याची सुविधा उपलब्ध करून द्यावी. ही शैक्षणिक सवलत घेतल्यामुळे विद्यार्थिनीला कोणत्याही प्रकारे अनुपस्थितीची नोंद करू नये, दंड आकारू नये किंवा आंतरिक गुणांमध्ये कपात करू नये.

२. दुसरे म्हणजे, घटक चाचणी, प्रात्यक्षिक परीक्षा, सहामाही परीक्षा किंवा इतर कोणत्याही मूल्यमापनाच्या कालावधीत विद्यार्थिनी मासिक पाळीमुळे उपस्थित राहू शकली नाही तर तिला पुनर्परीक्षेची संधी उपलब्ध करून द्यावी, त्यासाठी कोणतेही अतिरिक्त शुल्क आकारू नये.

३. तिसरे म्हणजे, प्रत्येक शैक्षणिक संस्थेत मासिक आरोग्य व्यवस्थापन, स्वच्छता, लैंगिक आरोग्य शिक्षण आणि प्रजनन आरोग्याबाबत नियमित जनजागृती कार्यक्रम आयोजित करावेत. यासाठी आरोग्य विभाग, समाजकल्याण विभाग व स्थानिक आरोग्य केंद्रांच्या सहकार्याने मार्गदर्शन उपलब्ध करून द्यावे.

४. चौथे म्हणजे, कार्यस्थळी लैंगिक छळ प्रतिबंधक कायद्यानुसार प्रत्येक शाळा व महाविद्यालयात विशाखा समिती किंवा अंतर्गत तक्रार निवारण समिती प्रभावीपणे कार्यरत असल्याची खात्री करावी आणि विद्यार्थिनींना त्यांच्या अधिकारांबाबत माहिती देणे आवश्यक आहे.

५. पाचवे म्हणजे, सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये मुलींसाठी स्वच्छ शौचालये, सुरक्षित पाणीपुरवठा, सॅनिटरी नॅपकिन्सची मोफत किंवा अल्प दरात उपलब्धता आणि त्यांची सुरक्षित विल्हेवाट लावण्याची व्यवस्था या मूलभूत सुविधा बंधनकारक स्वरूपात उपलब्ध करून द्याव्यात. ज्या संस्थांमध्ये पाणीपुरवठा, स्वच्छता किंवा पायाभूत सुविधांची अडचण आहे त्यांनी संबंधित नगरपालिका, महानगरपालिका किंवा ग्रामपंचायतीकडे तातडीने प्रस्ताव पाठवून आवश्यक कार्यवाही करण्यात यावी. सहावे म्हणजे, स्थानिक स्वराज्य संस्थांनी त्यांच्या हद्दीतील सर्व

Scanned with OKEN Scanner

शैक्षणिक संस्थांमध्ये मुलींसाठी सुरक्षित व स्वच्छ वातावरण असलेले आहे की नाही याची नियमित निरीक्षण व पाठपुरावा करावा.

हे निवेदन कोणत्याही संस्थेविरुद्ध आरोप म्हणून नव्हे तर विद्यार्थिनींच्या आरोग्य, सन्मान आणि शैक्षणिक समतेच्या दृष्टीने सकारात्मक धोरणात्मक पाऊल उचलावे या हेतूने सादर करण्यात येत आहे. राज्यातील सर्व विद्यार्थिनींना त्यांच्या नैसर्गिक जैविक गरजांमुळे शैक्षणिक नुकसान होणार नाही याची खात्री करणे ही शासनाची नैतिक व संवैधानिक जबाबदारी आहे.

तरी वरील विषयासंदर्भात शासनस्तरावरून स्पष्ट धोरणात्मक परिपत्रक निर्गमित करून राज्यातील सर्व शाळा, महाविद्यालये व तंत्रशिक्षण संस्थांना बंधनकारक मार्गदर्शक सूचना जाहीर करण्यात याव्यात, ही नम्र विनंती.

धन्यवाद !

आपला विश्वासू,

चि. प्रसाद अरविंद भालेकर
समूहप्रमुख
जीवन केशरी मराठी विद्यार्थी समूह, नाशिक
मो. ७४९९३५४०४२
ईमेल : jivankeshrimarathi@gmail.com

प्रत माहितीस्तव व आवश्यक कार्यवाहीसाठी –

१. मा. प्रधान सचिव, महिला व बालविकास विभाग , महाराष्ट्र शासन
२. मा. आयुक्त ( शिक्षण ) , महाराष्ट्र राज्य
३. मा. संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य
४. मा. संचालक , उच्च व तंत्रशिक्षण संचालनालय , महाराष्ट्र राज्य
५. मा. उपसंचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय , नाशिक विभाग
६. मा. उपनिर्देशक, उच्च शिक्षण , नाशिक
७. मा. जिल्हाधिकारी, नाशिक
८. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक